पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
मुख्य लेखा परिक्षण विभाग,
क्र : मुलेप/६/कावि/१४/२०१५
दिनांक:-२३/०६/२०१५

**विषय :- मुदत बाह्य आणि दावा न सांगितलेल्या अनामत रकमा व्यपगत करण्याबाबत.....**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत भांडवली/महसुली कामांसाठी ठेकेदारांकडून ठेवस्वरूपात /बँक डिमांड ड्राफ्टव्दारे अल्प मुदतीसाठी अथवा दिर्घ मुदतीसाठी सुरक्षा ठेवी, अनामत रकमा स्विकारण्यात येतात. निविदेचे वाटप केल्यावर किंवा इतर अनामत रकमांबाबत करारनाम्यातील अटी व शर्तींनुसार तसेच संबंधित कामाच्या समाधानकारकरित्या पुर्ततेवर आणि महानगरपालिकेस देय असलेल्या इतर रकमांची पूर्ण खात्री पटल्यानंतर ठेकेदाराला सुरक्षा अनामत ठेव परत करण्यात येते. **त्यानुसार परतावा योग्य ठेवींचा तीन पुर्ण लेखांकन वर्षाकरीता दावा सांगण्यात आला नाही तर अशा अनामत रकमा महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम २९९ नुसार व्यपगत होतात आणि अशा व्यपगत रकमा मनपा निधीमध्ये स्थानांतरीत होण आवश्यक आहे.** मनपाचे विविध विभागांचे लेखापरिक्षणात वरील नियमांनुसार परतावा योग्य रकमा मनपा निधीत वर्ग करण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे.

सबब, परताव्या योग्य असलेल्या व तीन पुर्ण लेखांकन वर्षाकरीता दावा सांगण्यात आलेला नाही अशा अनामत रकमा/ठेवी आपले विभागामध्ये असल्यास त्याबाबत वरील नियमानुसार दि.    /०८/२०१५ पर्यंत कार्यवाही करण्यात यावी. तसेच यापुढे अशा ठेवींबाबत वरील नियमानुसार वेळच्या वेळी कार्यवाही करण्यात यावी. **या संदर्भात विभागाने केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल मुख्य लेखापरिक्षण विभागास सादर करण्यात यावा.**

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
सर्व शाखाप्रमुख
-------------------- विभाग